Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# कौशल्य आधारित शिक्षण ही काळाची गरज !!

प्रा. डॉ. सुदाम राठोड (सहाय्यक प्राध्यापक)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालय, मोराणे, धुळे

**प्रस्तावना**

**शिक्षण हे मुक क्रांतीचे हत्यार आहे !!**

**एम. के. गांधी**

शिक्षण माणसाला माणूसपण प्रदान करत असते. शिक्षणाने संपन्न झालेले मस्तक कोणाचे हस्तक होत नाही आणि जे हस्तक असतात ते गुलाम असतात. खऱ्या अर्थाने शिक्षणामध्ये खूप मोठी ताकद आहे. या शिक्षणरूपी अस्त्राकडे डोळसपणे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे माणसांमध्ये अज्ञान, अंधश्रद्धा, वाईट चालीरीती, प्रथा, परंपरा दूर होऊ शकते. पण या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप असला पाहिजे. सकारात्मक विचार करणारेच शिक्षणरूपी या महाकुंभामध्ये यशस्वी होतात हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

Keyword - कौशल्य, शिक्षण, विज्ञान

**अंगभूत कौशल्य सद्याची गरज :**

वास्तविक पाहता अंगभूत कौशल्य ही संज्ञा समाज- मानसशास्त्रातील आहे. त्यात विविध गोष्टींचा अंतर्भाव होतो. जसे की लेखन कौशल्य, अंतर वैयक्तिक कौशल्य, बोधन कौशल्य आणि इतर खालील निर्देशित कौशल्य जे व्यक्ती जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. प्रगतीच्या या काळात कौशल्यवृद्धी उपयोगी ठरते. तणावपूर्ण परिस्थितीत स्वतःवर काबू मिळविणे ,व्यक्तीचे प्रभाव पूर्ण आणि अर्थपूर्ण जीवन जगणे याच्याशी ही कौशल्य निगडित असतात. खऱ्या अर्थाने अंगभूत कौशल्याला आपण मानवी कौशल्यही म्हणू शकतो, नव्हे तर जीवन कौशल्य हेही म्हणता येईल. अंगभूत कौशल्याच्या व्याख्येनुसार "अंगभूत कौशल्य म्हणजे स्वतःला समजून घेणे, प्रतिसादाला योग्य उत्तर देणे, परिणामकारक हाताळणी सहवेदना अनुभवणे आणि विश्वास -आदर अर्थपूर्ण रीतीने दुसऱ्याशी आदान प्रदान करणे. अशीही नातेसंबंधाची जोपासना करणे होय"

**अत्याधुनिकता आणि कौशल्याची गरज :**

मुळात एकविसाव्या शतकातील या विज्ञान युगामध्ये प्रत्येकांना अत्याधुनिक, अद्यावत होणे ही काळाची गरज झालेली आहे. प्रचंड अशा स्पर्धेमध्ये स्वतःला अपडेट राहणे हे अपरिहार्य आहे .आधुनिक युवा पिढीला अनेकविध कौशल्य आत्मसात करता आले पाहिजे जसे की -

१.संगणक कौशल्य
२. लेखन कौशल्य
३.संवाद कौशल्य
४.विश्लेषण कौशल्य

५.प्रशिक्षण कौशल्य

६.मुलाखत कौशल्य

७.सादरीकरण कौशल्य,

८. अंतर वैयक्तिक सहसंबंध कौशल्य,

९. संशोधन कौशल्य

१०. निरीक्षण कौशल्य,इत्यादी

**१.संगणक कौशल्य :**

प्रगतीच्या आणि जीवघेण्या स्पर्धेमध्ये स्व विकासासाठी संगणक कौशल्य ही काळाची गरज आहे. पूर्वी व आजही इंग्रजी संवाद व ज्ञानाला  महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. पण आज इंग्रजी सोबतच संगणक साक्षरतेलाही जीवनामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. संगणकाचा योग्य आणि विधायक वापर केले पाहिजे. संगणक कौशल्य असणारी व्यक्ती जगातील कोणत्याही बाबी मिळविण्यासाठी समर्थपणे यशस्वी ठरू शकते. संगणकाचे ज्ञान व त्याचा सातत्यपूर्ण वापर वेळोवेळी हवा. स्व विकासासाठी संगणक कौशल्याद्वारे अनेक बाबी आत्मसात करण्यासाठी सहाय्यभूत ठरतात. मुळात ज्याच्याकडे इंग्रजी ज्ञान व संगणक कौशल्य असेल त्याचा समाजातील दर्जा निश्चितच उंचावलेला असतो. समाजामध्ये त्याला पुरेशी किंमत आणि महत्त्व प्राप्त झालेले असते. खरे पाहतात ही आधुनिक काळाची गरज बनलेली आहे. संगणक साक्षरतेच्या माध्यमातून व्यक्ती आपले जीवन यशस्वी करू शकतो. त्यासाठी पोषक वातावरणाची नितांत गरज आहे. सकारात्मक दृष्टिकोन हवा तरच व्यक्ती जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतो असेच म्हणावे लागेल.

**२. लेखन कौशल्य:**

वस्तुतः प्रगतीच्या आणि विज्ञान युगाच्या या क्षेत्रामध्येही लेखनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. संगणकाच्या या काळामध्येही लेखनाचे महत्त्व अद्याप कमी झालेले नाही. घटनांचे विश्लेषण, कार्यक्रमांचे मुद्देशुध लेखन व्यक्ति जीवनात आवश्यक आहे. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी लेखन कलेला जीवनामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. अहवाल लेखन, पत्रलेखन, वृत्तांत लेखन, घटनांचे निवेदन इत्यादी बाबी मध्ये लेखन कलेला महत्त्वाचे स्थान आहे. प्रभावी आणि मुद्देसूद लेखनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. प्रभावी लेखनाला सतत प्रोत्साहन देणे गरजेचे असते, नव्हे तर अशा मांडणी व  प्रभावी लेखनावरून व्यक्ती स्पष्ट होत असतो.

लेखन कौशल्य वाढीसाठी सतत सराव हवा. त्यासाठी वाचन हवे, ज्ञानाने संपन्न झालेले व्यक्तीच सतत लेखन करीत असते. नव्हे तर त्यांच्याकडे शब्द भांडार अधिक असतो. शब्द भंडाराच्या आधारेच लेखन कौशल्य वृद्धिंगत होऊ शकत असते. यासाठी व्यक्ती जीवनामध्ये सातत्य हवा आणि  विविधांगी क्षेत्राचे वाचन हवे.

**३. संवाद कौशल्य:**

वस्तूतः संवाद कौशल्य प्रत्येक व्यक्तीकडे असणे गरजेचे आहे. प्रभावी संवाद कौशल्य असेल तरच युवक प्रगती करू शकतो. संवाद कौशल्याला आजच्या प्रगतीच्या क्षेत्रामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. सुसंवाद प्रगतीसाठी तारक ठरतात. त्यासाठी संवाद कौशल्य सतत विकसित केले पाहिजे. यासाठी अधिक ज्ञान व वाचन

हवे सतत वाचन व ज्ञानार्जनाने आणि सुसंवादी स्वभावामुळे अनेक बाबी व्यक्तीला आत्मसात करता येतात. युवकांमध्ये संवाद कौशल्य असणे व तेही प्रभावी असणे प्रगतीसाठी तारक ठरतात.

**४. विश्लेषण कौशल्य:**

प्रत्येक प्रकारच्या शिक्षणामधून युवकांमध्ये विश्लेषण कौशल्य आत्मसात झाली पाहिजे असेच शिक्षण हवे. ज्यांच्याकडे विश्लेषण कौशल्य आहे तो अनेक बाबींची वास्तविक चिकित्सा करू शकतो. योग्य -अयोग्य बाबी संदर्भात युवक चौकस असला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषण कौशल्य विकसित होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले पाहिजे. नव्हे तर व्यक्ती जीवनात पदोपदी विश्लेषण कौशल्याची नितांत गरज असते. घडलेल्या घटनेचे तंतोतंत विश्लेषण करता आले पाहिजे. युवा पिढीमध्ये तर्कशुद्ध विश्लेषण कौशल्यच अंधानूकरणाला अलिप्त ठेवू शकतात. विश्लेषणाच्या आधारावरच नवनवीन बाबीचे आकलन होऊ शकते. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा विश्लेषण कौशल्याची आज नितांत गरज आहे. ज्यांच्याकडे विश्लेषण कौशल्य प्रभावी आहे अशाच तरुणांना परिपूर्ण संधी प्राप्त होतात हे नाकारता येत नाही.

**५. प्रशिक्षण कौशल्य:**

आधुनिक शिक्षण प्रणाली मध्ये प्रशिक्षण कौशल्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. जीवनाच्या अनेक पातळीवर प्रशिक्षणाची गरज असते. प्रशिक्षणासाठी तीही गुणवत्तादायी प्रशिक्षणासाठी सकस मानसिकता हवी. प्रगल्भ विकासासाठी प्रशिक्षण कौशल्य आत्मसात असणे अत्यावश्यक आहे. सकारात्मक मानसिकताच प्रशिक्षण कौशल्य आत्मसात करण्यासाठी सहाय्यभूत ठरत असते. व्यक्ती जीवनात प्रशिक्षण कौशल्याला महत्त्वाचे स्थान आहे. प्रभावी प्रशिक्षणाच्या माध्यमातून अनेक बाबी प्राप्त करता येतात. ज्या बाबी माहीत नाही त्या जाणून घेण्यासाठी व मिळविण्यासाठी अनेक प्रकारचे प्रशिक्षण कार्यशाळा उपयुक्त ठरत असतात. आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये प्रशिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. दर्जेदार प्रशिक्षणच तरुण पिढी घडवू शकते. त्यामुळे आधुनिक शिक्षण प्रणाली मध्ये प्रभावी प्रशिक्षणाचा अंतर्भाव केला पाहिजे. अशा प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून अनेक बाबीची उकल होत असते . अभ्यासाव्यतिरिक्त विविध प्रकारच्या प्रशिक्षण कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना संधी दिली पाहिजे. या प्रशिक्षण कार्यशाळेतून मुलं व्यक्त होत असतात आणि म्हणून अशा प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून प्राप्त झालेली प्रशिक्षण कौशल्य पुढील आयुष्य तारू शकतात हेही तेवढेच खरे.

**६. मुलाखत कौशल्य:**

वास्तविक पाहता आजच्या शिक्षण व्यवस्थेमधून तरुणांना मुलाखत कशी द्यावी, मुलाखतीला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी कोण कोणत्या प्रकारची तयारी करायला हवी, यासंदर्भात वेळोवेळी प्रशिक्षण दिले पाहिजे. केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे एवढाच उद्देश डोळ्यासमोर न ठेवता विद्यार्थ्यांना, युवकांना मुलाखत कौशल्य आत्मसात करण्यासाठी वेळोवेळी प्रोत्साहन दिले पाहिजे. मुलाखतीला जाताना पेहराव कसा हवा, भाषा कशी हवी, विषयाचे आकलन, चौफेर ज्ञान याविषयी चौकस असणे. नव्हे तर संवाद कौशल्याची जोड हवी. मुलाखतीला जाताना सकारात्मक मानसिकता, विषयाचे संपूर्ण ज्ञान, स्पष्टवक्तेपणा इत्यादी बाबी आत्मसात असणे गरजेचे आहे. युवा अवस्थेमध्ये अनेक- अनेक पातळीवर मुलाखतीला सामोरे जाणे अपरिहार्य

असते. अशा परिस्थितीत आत्मविश्वास, सकारात्मकता, ज्ञानाने ओतप्रोत असणे खऱ्या अर्थाने यशस्वीतिकडे जाण्यासाठी राजमार्ग ठरतो आणि म्हणूनच यशस्वी जीवनासाठी मुलाखत कौशल्य काळाची गरज आहे.

**७ सादरीकरण कौशल्य:**

आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाचे, अनुभवाचे, प्रेक्षणीय, ऐतिहासिक भेटीचे व्यवस्थित सादरीकरण करण्यासाठी तयारी हवी. त्यासाठी मानसिकता हवी आणि सादरीकरण कौशल्याच्या आधारेच व्यक्ती यशस्वी होऊ शकतो. म्हणून व्यक्ती जीवनात अशा कौशल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवनाच्या यशस्वीतेसाठी युवकांना जीवन कौशल्यच तारू शकतात. पण त्याचा वापर प्रसंगांनुसार होणे गरजेचे आहे. उत्तम सादरीकरण कौशल्य असेल तरच विद्यार्थी उत्तरोत्तर प्रगती करू शकतो. यासाठी चौफेर ज्ञान असणे आवश्यक आहे. आधुनिक काळात प्रभावी सादरीकरणाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. श्रोत्यांना समजेल, समोरच्याला रुचेल अशी भाषा हवी, प्रभावी स्पष्ट शब्द फेक हवा, सादरीकरणांमध्ये चढ उतार हवा, आवाजामध्ये चढ उतार सादरीकरणाला योग्य दिशा प्राप्त करून देते .प्राप्त परिस्थितीनुसार विविध माध्यमांचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावी सादरीकरण करता आले पाहिजे. यासाठी सादरीकरण कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहे. वेळप्रसंगी पावर पॉइंट प्रेझेंटेशन, पोस्टर, चार्ट ,व्हिडिओ , संख्यात्मक माहितीनुसार टेबल ,इत्यादीचाही वापर करता आला पाहिजे.

**८. अंतर वैयक्तिक संबंध :**

वास्तविक पाहता आधुनिक शिक्षण प्रणाली मध्ये अंतर वैयक्तिक संबंधाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कौशल्याधारित शिक्षण प्रणाली मध्ये पियर लर्निंग यासाठी अंतर वैयक्तिक संबंध निकोप असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी वेळोवेळी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षकांची अशा अंतर वैयक्तिक संबंध वाढीसाठी महत्त्वाची भूमिका आहे. कारण एखादी गोष्ट आपल्याला समजत नसेल तर ते इतरांकडून प्राप्त करून घेता येते. पण यासाठी सुसंवादी आणि निकोप वातावरण वाढीस शिक्षण व्यवस्थेमध्ये प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे. अशा अंतर वैयक्तिक सहसंबंधाच्या कौशल्याच्या माध्यमातून तरुण यशस्वी होऊ शकतो. यासाठी सतत सल्ला आणि मार्गदर्शन करणे अत्यावश्यक आहे.

**९.संशोधन कौशल्य:** आज प्रत्येक क्षेत्रामध्ये पदोपदी संशोधनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे व्यक्ती जीवनामध्ये सतत संशोधन करता आले पाहिजे संशोधनाच्या माध्यमातून अनेक बाबींची उकल होत असते, नव्हे तर शोध लागत असतो. नवनवीन बाबी शोधण्यासाठी संशोधन कौशल्य व्यक्ती जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. विज्ञानवादी जगामध्ये संशोधन हे नित्याचे झालेले आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये संशोधनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

**१०. निरीक्षण कौशल्य:** प्रत्येक व्यक्ति मध्ये निरीक्षण कौशल्य उपजतच असते. निरीक्षण कौशल्याचा व्यक्ती जीवनामध्ये व्यावसायिक जीवनामध्ये वेळोवेळी योग्य पद्धतीने उपयोग करता आले पाहिजे. म्हणूनच प्रगतीच्या आणि विज्ञानवादी जगामध्ये शास्त्रशुद्ध निरीक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा वेध घेणे, त्याचे निरीक्षण करणे आणि योग्य पद्धतीने विश्लेषण करणे हे ज्याला जमते तो

यशस्वी होऊ शकतो. म्हणूनच शास्त्रीय निरीक्षणाला अलीकडच्या काळामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

**सारांश**

आधुनिक जगामध्ये कोणत्याही व्यक्तीला प्रभावी आणि अनेकांगी कौशल्यच तारू शकतात म्हणून प्रत्येकां कडे बहुआयामी कौशल्य असणे अत्यंत आवश्यक आहे. या अशा कौशल्याच्या आधारावरच व्यक्ती यशस्वी जीवन जगू शकतो. वरील कौशल्याच्या सोबतच  संवाद कौशल्य, भाषा कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, कार्यक्रम नियोजन कौशल्य,इत्यादी कौशल्याची या स्पर्धेच्या जगामध्ये पदोपदी व्यक्तीला आवश्यकता आहे. या आणि अशा अनेक जीवन कौशल्याच्या आधारे व्यक्ती आपल्या जीवनाला यशस्वी शिकरा कडे घेऊन जाऊ शकतो.

**संदर्भ**

1. Sukkoo kim: Theories, Facts and Policies, Washington DC

2. Kewale Stenner: Interview,Sej publication

3. Dr.R Sudam: Skill Training for Social Worker,Yking Publication,Jaipur

4. Websites, Magazine,etc